**<u>नगर रचना योजना क्र.१-ठाणे (प्रथम फेरफार)</u>**
**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ९१(२) अन्वये नगर रचना योजनेमधील दुरुस्ती करणेकरीता ठाणे महानगरपालिकेस प्राधिकृत करणेबाबत.**

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्रंमाक-टिपीएस-१२१७/२६१८/प्र.क्र.२६०/१८/नवि-१२,
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१९.

**शासन निर्णय** :- सोबत जोडलेली अधिसूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

Ashok
Kashirao
Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 14:57:09 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी.**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.
२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
४) जिल्हाधिकारी, ठाणे.
५) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई.
६) उपसचिव तथा उपसंचालक (नगर रचना), मंत्रालय,मुंबई -३२ यांचे स्विय सहाय्यक.
७) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.
८) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,चर्नी रोड,मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्र कोकण विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई व सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे यांना पाठवाव्यात.)
९) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९,
यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
१०) निवडनस्ती (कार्यासन-नवि-१२).

**<u>Maharashtra Regional and Town Planning Act,1966</u>**,
To authorise the Thane Municipal Corporation under Section 91(2) of the Act to prepare draft of variation to the Town Planning Scheme-1, Thane.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Unban Development Department,**
**4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai-400 032.**
**Dated:- 6th February, 2019.**

## <u>NOTIFICATION</u>

**No. TPS-1717/2618/C.R.260/18/UD-12,**

Whereas, Town Planning Scheme-1, Thane (hereinafter referred to as “the said Town Planning Scheme”) has been sanctioned by the State Government in Urban Development Department vide Notification No. TPS-1278/1106/UD-5, dated the 18/1/1985 under section 86(2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) which has come into force with effect from 1/5/1985;

And whereas, as per the “Form-B” of the said Town Planning Scheme, the Final Plot No.393 has been mentioned twice. Out of which one admeasuring 2724.18 sq. mt. is allotted to Thane Municipal Corporation and other one admeasuring 483.09 sq. mt. is allotted to Shri M. V. Modak;

And whereas, Final Plot No.393 which is allotted to Thane Municipal Corporation is shown as the Final Plot No. 293 in the Town Planning Scheme Plan and it is typographical mistake while mentioning the same in Form-B of the scheme book as 393 and hence the Assistant Director of Town Planning, Thane Municipal Corporation has requested Government vide letter dated 28/7/2017 to authorise the Thane Municipal Corporation under section 91(2) of the said Act, to correct the Form-B in this regard;

And whereas, after consulting the Director of Town Planning, Maharashtra State and after making necessary inquiries, the Government is of

the opinion that the Final Plot allotted to the Thane Municipal Corporation should be numbered as 293 instead of 393 by correcting the "Form-B" of the said 'Town Planning Scheme' (hereinafter referred to as the "said proposed variation");

Now, therefore the State Government hereby authorizes the Thane Municipal Corporation under sub-section (2) of Section 91 of the said Act, to undertake the said proposed variation in the Town Planning Scheme-1, Thane in respect of following item.

**a)** To correct the number of Final Plot No. 393 as 293 which is allotted to the Thane Municipal Corporation in the column of Final Plot No. of the "Form-B" in the Scheme Book of said Town Planning Scheme.

**b)** The Thane Municipal Corporation shall accordingly prepare and publish the draft variation as per provision laid down under Section 91(2) of the said Act within six months.

This Notification is available on the Government website www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 14:58:10 +05'30'

**(Ashok K. khandekar)**
**Section Officer.**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
**नगर रचना योजना क्र.-१, ठाणे च्या 'फॉर्म-बी' मध्ये फेरबदल करणेकरिता ठाणे महानगरपालिकेस कलम ९१(२) अन्वये प्राधिकृत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१९.**

**अधिसुचना**

**क्रमांक-टिपीएस-१२१७/२६१८/प्र.क्र.२६०/१८/नवि-१२.**

ज्याअर्थी, नगर रचना योजना क्र.१, ठाणे (यापुढे जिचा उल्लेख "उक्त नगर रचना योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ८६(२) मधील तरतुदीनूसार शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्र.टिपीएस-१२७८/११०६/नवि-५, दि.१८/१/१९८५ अन्वये मंजूर झाली असून, दिनांक १/५/१९८५ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना योजनेच्या स्कीम बुकच्या "फॉर्म-बी" मध्ये अंतिम भुखंड क्र. ३९३ दोनदा नमूद झालेला आहे. यापैकी एक भुखंड ठाणे महानगरपालिकेच्या मालकीचा दर्शविलेला असुन त्याचे क्षेत्र २७२४.१८ चौ. मी. इतके आहे व दुसरा भूखंड श्री. एम. व्ही. मोडक यांचे नावे दर्शविण्यात आला असुन त्याचे क्षेत्र ४८३.०९ चौ. मी. इतके दर्शविण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या नावे दर्शविण्यात आलेला अंतिम भूखंड क्रमांक ३९३ हा नगर रचना योजना नकाशामध्ये अंतिम भूखंड क्रमांक २९३ असा नमूद असुन "फॉर्म-बी" मध्ये तो टंकलेखनाच्या चुकीने ३९३ असा नमुद झालेला असल्याने "फॉर्म-बी" मध्ये २९३ याप्रमाणे दर्शविण्याचा फेरबदल करण्याकरिता ठाणे महानगरपालिकेस उक्त अधिनियमाच्या कलम ९१(२) नूसार प्राधिकृत करावे, अशी विनंती सहायक संचालक, नगर रचना, ठाणे महानगरपालिका यांनी शासनास दि.२८/७/२०१७ च्या पत्रान्वये केली आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर उक्त नगर रचना योजनेच्या "फॉर्म-बी" च्या तक्त्यामध्ये

ठाणे महानगरपालिकेच्या नावे दर्शविण्यात आलेला अंतिम भूखंडाचा क्रमांक ३९३ ऐवजी २९३ अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रस्तावित फेरफार "असा करण्यात आला आहे);

आता त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ९१ चे पोट कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार राज्य शासन ठाणे महानगरपालिकेस, नगर रचना योजना क्र.-१, ठाणे मध्ये खालील बाबींसंदर्भात उक्त प्रस्तावित फेरफार कार्यान्वीत करणेसाठी प्राधिकृत करीत आहे.

१) उक्त नगर रचना योजनेच्या “फॉर्म-बी” मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या नावे दर्शविण्यात आलेल्या अंतिम भूखंडाचा क्रमांक ३९३ ऐवजी २९३ असा स्किम बुक मधील “फॉर्म-बी” च्या अंतिम भूखंड क्रमांकाच्या रकान्यात दुरुस्ती करणे.

२) ठाणे महानगरपालिकेने त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ९१(२) मध्ये विहीत केलेप्रमाणे फेरफाराचा मसुदा तयार करुन सहा महिन्यात प्रसिध्द करावा.

सदरची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 15:01:12 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**

**कार्यासन अधिकारी**